महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दूरध्वनी क्र ०२२-२२७९३८२९

क्रमांक :- अनौ.सं.२०२५/उवतंशि/प्र.क्र. ०१/का.४ दिनांक :- ०७ जानेवारी, २०२५.

प्रति,
मा. महाप्रबंधक,
उच्च न्यायालय,
मुंबई

विषय :- पीठासन अधिकारी, विद्यापीठ व महाविद्यालयीन न्यायधिकरण या पदाकरीता अर्हताप्राप्त मा. न्यायमूर्तींच्या नावांची शिफारस यादी उपलब्ध करण्याबाबत..

मा. महोदय,

मुंबई विद्यापीठ, मुंबई व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथील विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरणावर पीठासन अधिकारी पदावर कार्यरत व्यक्ती अनुक्रमे दि. १७/१०/२०२४ व दि. २८/१०/२०२४ रोजी सेवानिवृत्त झाल्या आहेत. सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेल्या पदांवर नियुक्ती करण्याकरीता अर्हताप्राप्त व्यक्तींच्या नावांची शिफारस उपलब्ध करण्याची विनंती उच्च व तंत्र शिक्षण विभागाने केली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ८०(३) मध्ये पीठासन अधिकारी पदाची पात्रता/अर्हता नमूद केली आहे. त्यानुसार पीठासन अधिकारी पदावर नियुक्त होणारी व्यक्ती उच्च न्यायालयाची कार्यरत/सेवानिवृत्त न्यायाधीश किंवा उच्च न्यायालयाची न्यायाधीश म्हणून नियुक्त होण्यास अर्हता प्राप्त असणारी व्यक्ती असेल. याशिवाय सदर पदी नियुक्त करावयाची व्यक्ती ही, मुंबई उच्च न्यायालयाच्या मा. मुख्य न्यायमूर्ती यांनी शिफारस केलेल्या तीन व्यक्तींच्या नामिकेमधील असावी, अशी तरतूद आहे.

त्यानुसार सदर दोन पदांकरीता मा.मुख्य न्यायमूर्तींनी शिफारस केलेल्या उक्त अर्हताधारक प्रत्येकी.३ इच्छुक न्यायमूर्तींच्या नावांची शिफारस शासनास उपलब्ध करुन देण्याची आपणास नम्र विनंती आहे.

आपला,

(राजेश सु. वडनेरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन